वर्ष : ०४ | अंक: २ | मुंबई, मंगळवार ५ डिसेंबर २०१७ ते ११ डिसेंबर २०१७ | पृष्ठ: ८

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 फेरीवाल्यांना हटवण्यासाठी रहिवाशांचा फुगार

3 → आशेची नवी पालवी

आदिगुरू - श्री दत्तात्रेय ← 4

# मुंबईला 'ओखी'चा धोका कायम



**मुंबई - तामिळनाडू आणि केरळमध्ये हाहाकार उडवणारे ओखी चक्रीवादळ मुंबई लगतच्या अरबी समुद्रात काहीसे स्थिरावले आहे. पण या वादळामुळे मुंबईलगतच्या किनाऱ्यावर धोका निर्माण झाला असून भरतीच्या वेळेस ४ ते ५ मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची भीती आपत्कालीन विभागाने व्यक्त केली आहे. मुंबई शहराची भौगोलिक रचना विचारात घेता समुद्रकिनाऱ्याजवळ राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**

ओखी चक्रीवादळ सध्या मुंबईलगत अरबी समुद्रात दक्षिणेकडे साधारणत: १००० कि. मी अंतरावर स्थिरावले असले तरी कोकण किनारपट्टीत यामुळे पुढील तीन ते चार दिवस समुद्र खवळलेला राहणार असल्याने सुमद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, त्याचबरोबर भरतीच्या वेळेस समुद्रावर जाऊ नये असा इशारा देण्यात आला आहे. वादळाची दिशा कशी रहाणार याकडे हवामान खात्याचे लक्ष असून यासंर्भात देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्याच्या सूचना आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिल्या आहेत.

### चैत्यभूमीवर ६ डिसेंबरला खबरदारी घेण्याच्या सूचना

अरबी समुद्रात ४ ते ७ डिसेंबर या कालावधीत अरबी समुद्रात उंच लाटांची भरती येण्याची शक्यता आहे. यामुळे कॅडल रोड व शिवाजी पार्क परिसरात समुद्राचे पाणी शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने ६ डिसेंबरला दादरच्या चैत्यभूमीवर होणारी आंबेडकरांच्या अनुयायांची गर्दी लक्षात घेता सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात याव्यात. सुरक्षेच्या कारणास्तव समुद्रकिनाऱ्यावर जाण्यास लोकांना मज्जाव करण्यात यावा, अशा सूचना पालिकेच्या आपत्कालीन विभागाने दिल्या आहेत.




# १ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प?; थेट करांत होणार बदल

**नवी दिल्ली- वस्तू व सेवा कर (जीएसटी) योजनेची अंमलबजावणी झाल्यानंतरचा पहिलाच अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली पुढील वर्षी एक फेब्रुवारी रोजी मांडतील, अशी शक्यता आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३० जानेवारी रोजी सुरू होण्याची शक्यता असून, राष्ट्रपती रामनाथ कोविंद संसदेच्या दोन्ही सभागृहांना उद्देशून भाषण करतील, अशी माहिती एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने दिली.**

आर्थिक पाहणी अहवाल ३१ जानेवारीला सादर होणार असून, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होईल, अशी शक्यता संबंधित अधिकाऱ्याने व्यक्त केली आहे. ब्रिटिश परंपरेनुसार देशात आजवर फेब्रुवारीच्या अखेरीस अर्थसंकल्प सादर केला जातो. मात्र, या परंपरेला छेद देऊन जेटली एक फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अर्थसंकल्प एक महिना आधी सादर करून त्यातील तरतुदींची अंमलबजावणी एक एप्रिलपासून, म्हणजे नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच होऊ शकते. त्याचप्रमाणे रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्रपणे सादर करण्याची सुमारे शंभर वर्षांची परंपरा मोडून आता ते अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून एकत्रच सादर केले जाणार आहे.

संसदेचे हिवाळी अधिवेशन १५ डिसेंबर रोजी सुरू होणार असून, ते पाच जानेवारीपर्यंत चालेल. या पार्श्वभूमीवर, दोन अधिवेशनांदरम्यान एक महिन्यापेक्षा कमी अवधी राहील, अशा पद्धतीने अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे संभाव्य वेळापत्रक आखण्यात आले आहे. 'इंदिरा गांधी पंतप्रधान असताना म्हणजे सन १९७६मध्ये हिवाळी अधिवेशन जानेवारीमध्ये झाले होते. मात्र, फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशीच अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. त्यामुळे दोन्ही अधिवेशनांदरम्यान एक महिन्याचा काळ होता.



# वीजबिल महागणार?

***नवी दिल्ली - सध्याच्या महागाईत खिशावरील बोजा आधीच वाढलेला असताना, लवकरच त्यात वाढीव वीजबिलाची भर पडणार आहे. ऊर्जानिर्मिती प्रकल्पांची रचना पर्यावरणपूरक करण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांच्या खर्चाचा बोजा ग्राहकांवर टाकण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकार लवकरच मान्यता देण्याची शक्यता आहे.***



असे झाल्यास देशभरातील वीजग्राहकांवर अतिरिक्त बोजा पडून त्यांच्या वीजबिलात वाढ होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकार आणि 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटरी कमिशन'तर्फे या संदर्भात एक प्रस्ताव देण्यात येणार आहे. या संदर्भात ऊर्जा मंत्रालयाने वीज नियामकाचा सल्ला घेण्याचा निर्णय घेतला आहे. विजेची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी या संदर्भात ऊर्जा मंत्रालय आणि 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी रेग्युलेटरी कमिशन'ची परवानगी मागितली आहे. पर्यावरणाचे निकष पूर्ण करण्यासाठी प्रतिमेगावॉट ७० लाख रुपयांपासून एक कोटी रुपयांपर्यंतचा खर्च येण्याची शक्यता आहे. जर, या प्रस्तावास मान्यता मिळाली तर, वीजबिलात प्रति युनिट २० ते ३० पैशाची वाढ होण्याची शक्यता आहे. पर्यावरणाशी संबंधित मंत्रालयाने डिसेंबर २०१५मध्ये प्रसिद्धीपत्रक जारी करून कोळशावर आधारित ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी पर्यावरणविषयक नवे नियम जाहीर केले होते. या नियमांचे पालन करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी देण्यात आला होता. मात्र, अजूनही नियमांचे पालन पूर्ण न झाल्याने ऊर्जा मंत्रालयाने मुदत वाढविण्याची विनंती केली आहे.




# भाजपाला मांजरास वाघ व कुत्र्यास हत्ती करण्याची कला साध्या झाली आहे

**मुंबई** - उत्तर प्रदेशात 'अपक्ष' व इतरांचाही 'विकास' जिंकला. तरीही पुनः पुन्हा विकास जिंकत असल्याचे दावे केले जात आहेत. जिथे ईव्हीएमने मतदान झाले, त्या महापालिकांमध्ये भाजपला यश मिळाले आणि जिथे ईव्हीएमने मतदान झाले नाही अशा ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मात्र 'कमळ' फुलले नाही. त्यामुळे 'जिथे ईव्हीएम तिथे कमळ' हा जो आक्षेप घेतला जात आहे त्यालाच जर तुम्ही दणदणीत विजय म्हणत असाल तर या दणदणीत विजयास आमच्या शुभेच्छा आहेत! अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सामना संपादकीयच्या माध्यमातून केली आहे.

गुजरात राज्यात 'विकास गांडो थयो छे' म्हणजे वेडा झाला असला तरी 'उत्तर प्रदेश में विकास जिंदा है' असे भाजपतर्फे सांगण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'योगी'राज्यात झाल्या. त्यात भाजपची सरशी झाली आहे व इतर पक्ष साफ भुईसपाट झाल्याचे जे चित्र समोर आणले जात आहे ते सत्य आहे काय? भाजपला आकडा फुगवून सांगण्याची खोड आहे व आकड्यांची खातरजमा न करता अभिनंदनाचे 'ट्विट' संदेश पाठविण्याची सवय पंतप्रधानांना आहे. महाराष्ट्रातील ग्रामपंचायती निवडणूक निकालांत याचा अनुभव आपण घेतला आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी नक्की कुणाचे अभिनंदन केले हा प्रश्न निर्माण होतो असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला आहे.

उत्तर प्रदेशात महानगरपालिका व नगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या. शहरी भागात भाजपने आघाडी घेतली आहे. १६ पैकी १४ शहरांत भारतीय जनता पक्षाचे महापौर विराजमान झाले, दोन ठिकाणी मायावती यांच्या बसपास यश मिळाले हे खणखणीत सत्य आहे व त्याबद्दल आम्ही भारतीय जनता पक्षाचे खास अभिनंदन करीत आहोत. समाजवादी पार्टी व काँग्रेसचा येथे साफ धुव्वाच उडालेला दिसतो, पण जे शहरात घडले ते उत्तर प्रदेशातील ग्रामीण भागात घडलेले दिसत नाही.

# नियतीचा क्रूर खेळ!

## आजारी मुलाला रुग्णालयात नेताना रुग्णवाहिकेला अपघात, मायलेकाचा मृत्यू

**नागपूर** - अमरावती महामार्गावर सोमवारी पहाटे भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. १२ वर्षांच्या आजारी मुलाला नागपूरमधील मेयो रुग्णालयात नेणाऱ्या रुग्णवाहिकेला विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने धडक दिली. या अपघातात १२ वर्षांचा मुलगा, त्याची आई आणि अन्य दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर पाच जण अपघातात जखमी झाले आहेत.

अकोल्यातील १२ वर्षांच्या मुलाची प्रकृती खालावल्याने त्याला तातडीने नागपूरमधील मेयो रुग्णालयात हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. आजारी मुलगा, त्याचे आई-वडिल आणि अन्य दोन जण एका रुग्णवाहिकेतून नागपूरला जाण्यासाठी निघाले. सोमवारी पहाटे चार वाजता रुग्णवाहिका नागपूर- अमरावती मार्गावर असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने रुग्णवाहिकेला धडक दिली.



ही धडक इतकी भीषण होती चौघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातात मुलगा, त्याची आई आणि अन्य दोघांचा मृत्यू झाला. तर मुलाचे वडील या अपघातात जखमी झाले आहेत. नागपूरमधील मेयो रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. ज्या रुग्णालयात मुलाला उपचारासाठी नेले जात होते, त्याच रुग्णालयात आता त्या मुलाचे शवविच्छेदन होणार असल्याने हळहळ व्यक्त होत आहे. धुक्यामुळे ट्रकचालकाला अंदाज आला नाही आणि हा अपघात झाला असावा, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# ईदचा 'आवाज' वाढला!

## ईद दिवशी पोलिसांनी ध्वनीप्रदूषण मोजले नाही!

**मुंबई** - ईद-ए-मिलादच्या निमित्ताने आवाज फाऊंडेशनने केलेल्या ध्वनिप्रदूषण नोंदीनुसार यंदाच्या मिरवणुकांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत लाऊडस्पीकरचा वापर कमी असल्याचे आढळून आले आहे. मात्र ठिकठिकाणी मिरवणुकांमध्ये दुचाकी वाहनांवरून सहभागी झालेल्यांच्या हॉर्नचा आवाज आणि गाड्यांच्या आवाजामुळे ९० डेसिबलपेक्षा अधिक ध्वनिप्रदूषण झाल्याची नोंद झाली आहे. आवाज फांऊडेशतर्फे मुंबई पोलिस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांना या निरीक्षणांसदर्भात पत्र पाठवण्यात आले आहे. यंदा ईदच्या निमित्ताने सर्वाधिक आवाज १०५ डेसिबल इतका नोंदवण्यात आला.

यंदाच्या मिरवणुकीमध्ये लाऊडस्पीकरचा वापर कमी होता, अशी माहिती आवाज फाऊंडेशनच्या संस्थापिका सुमेरा अब्दुल अली यांनी दिली. रे रोडजवळ शनिवारी सायं. ५.३० च्या सुमारास मिरवणुकीमध्ये ९७.५ डेसिबल इतका आवाज होता. डॉकयार्ड रोडवर हाच आवाज १०५.२ डेसिबलपर्यंत पोहोचला होता. प्रिन्स अली खान रुग्णालयाशेजारीही आवाजाची पातळी १०२.५ डेसिबल इतकी होती. रुग्णालयाच्या परिसरातसुद्धा शांततेत मिरवणूक काढण्यात आली नाही. सायं. ५.५०च्या सुमारास मोहम्मद अली रोडवर मुंबई पोलिस अतिरिक्त आयुक्तांच्या कार्यालयाजवळ मिरवणुकीतील आवाजाची पातळी ९२.५ डेसिबल होती. या तीनही ठिकाणी लाऊडस्पीकरचा आवाज सुरू होता. मात्र हातात ऑडिओ मीटर पाहिल्यावर



लाऊडस्पीकर बंद करण्यात येत होते, असे निरीक्षण सुमेरा अब्दुल अली यांनी नोंदवले.

जेजे रुग्णालय आणि क्रॉफर्ड मार्केट परिसरातील मिरवणुकीमध्ये लाऊडस्पीकर नव्हते, तरीही आवाजाने ९० डेसिबलची पातळी ओलांडली होती. भायखळा पुलाजवळही हीच परिस्थिती होती. यासाठी मिरवणुकीत सहभागी झालेल्यांचे सातत्याने वाजणारे हॉर्न, गाड्या रेस केल्यामुळे निर्माण होणारा आवाज याचे योगदान ध्वनिप्रदूषणामध्ये अधिक होते. यंदा गेल्या वर्षीपेक्षा ध्वनिप्रदूषणाच्या पातळीत घट झाली आहे. गेल्या वर्षी हा आवाज १११.५ डेसिबल इतका होता.



# फेरीवाल्यांना हटवण्यासाठी रहिवाशांचा पुढाकार

## मीरा-भाईंदरमध्ये शाळा, रुग्णालयांना फेरीवाल्यांचा विळखा

**भाईंदर - रेल्वे स्थानकापासून १५० मीटर आणि शाळा, रुग्णालये, धार्मिक स्थळांपासून १०० मीटर अंतरापर्यत फेरीवाल्यांनी व्यवसाय करू नये, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले असतानाही मीरा-भाईंदरमध्ये या आदेशाचे पालन होत नसल्याचे चित्र आहे. तिथे शाळा, रुग्णालयांना फेरीवाल्यांचा विळखा पडलेला असतो. मीरा रोडमधील एका शाळेजवळ व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना हटवण्यासाठी परिसरातील रहिवाशांनाच रस्त्यावर उतरावे लागले. या रहिवाशांनी पुढाकार घेऊन येथील फेरीवाल्यांना हटवले.**



एल्फिन्स्टन रेल्वे स्थानकातील दुर्घटना घडल्यानंतर शाळा, रुग्णालये आणि धार्मिक स्थळापासून १०० मीटर अंतरापर्यंतही फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास उच्च न्यायालयाने मनाई केली आहे. असे असताना मीरा रोड येथील शांती पार्क भागातील सेंट झेवियर या शाळेला अनधिकृत फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. शाळेत विद्यार्थ्यांना घेऊन येणाऱ्या वाहनांना तसेच शाळेच्या बसना या फेरीवाल्यांचा प्रचंड अडथळा होत असतो, शिवाय या ठिकाणी वाहतूक कोंडीदेखील सातत्याने होत असते. आसपास राहणाऱ्या रहिवासी सोसायट्यांनाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. फेरीवाल्यांना हटवण्याची वारंवार मागणी महापालिकेकडे केल्यानंतरही येथील फेरीवाले हटलेले नाहीत, उलट त्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे, अशी माहिती शाळेच्या समोरच असलेल्या शांतीनाथ दर्शन इमारतीच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्या सुरेखा शर्मा यांनी दिली. पालिकेकडून कारवाई होत नसल्याने अखेर सोसायटीच्या सदस्यांनीच रस्त्यावर उतरून फेरीवाल्यांना हटवले, परंतु दररोज असे करणे रहिवाशांना शक्य नसल्याने पालिकेने यात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. सोसायटीच्या सदस्यांसोबत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनीही पालिका आयुक्तांची भेट घेतली. न्यायालयाच्या निर्णयानुसार या भागात फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास प्रतिबंध करून या ठिकाणी ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

# अभ्यासिकेचे शुल्क दुप्पट

**ठाणे-** घरात अभ्यासासाठी जागा मिळत नसल्याने आणि शांत चित्ताने अभ्यास व्हावा, यासाठी विद्यार्थी ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अभ्यासिकेत धाव घेतात. गरीब घरातील अनेक विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका वरदान ठरली आहे. परंतु ऐन परीक्षांच्या काळात या अभ्यासिकेची फी ५०० रुपयांवरून एक हजार रुपये करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना ही फी परवडणारी नसून ती कमी करण्याची मागणी संचालक मंडळाने फेटाळून लावली आहे. पुढील एक आठवड्यात फी भरली नाही तर विद्यमान विद्यार्थ्यांचे नवा कमी करून नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल, असा इशाराच देण्यात आल्याने विद्यार्थी हतबल झाले आहेत. सर्वसाधारण कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात अभ्यासिकेसाठी भांडण्याची वेळ आली आहे. येत्या सोमवारी विद्यार्थी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर करणार आहेत. किमान ६० विद्यार्थ्यांचं फी आहेत. मराठी ग्रंथ संग्रहालयाला सरकारकडून वर्षाला सात लाखांचे अनुदान मिळत असताना ही दरवाढ का, असा प्रश्नही उपस्थित करण्यात येत आहे.



वाढीमुळे नुकसान होणार असून फी वाद रद्द करावी, किंवा कमी करावी अशी मागणी विद्यार्थी करणार आहेत. एक डिसेंबरपासून ग्रंथालयाच्या आवारात दुचाकी पार्क करण्यासाठीही विद्यार्थ्यांकडून २० रुपये प्रतिदिवस आकारण्यात येत असून महिना ६०० रुपये फक्त पार्किंगसाठी द्यायचे का, असा प्रश्न विद्यार्थी विचारत

घरात जागा नाही, किंवा अन्य कारणांसाठी अभ्यासिकेचा आधार असणाऱ्या विद्यार्थ्यांनी पराक्षांच्या काळात अभ्यास कुठे करावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अभ्यासिकेतील फी वाढीच्या निर्णयामुळे संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आणि संताप पाहायला मिळाला.

# आता इमारत बांधण्याची परवानगी ३० दिवसांत

**मुंबई -** ३० दिवसांत इमारत बांधण्याची परवानगी देणारे परिपत्रक राज्य सरकारने जुलैमध्ये काढले खरे,



पण या अवधीत परवानगी मिळाली नाही तर विकासकाने कोणाकडे तक्रार करायची याविषयी असणारा संभ्रम अखेर सरकारनेच दूर केला आहे. तक्रारींची दखल घेण्यासाठी विशेष अधिकाऱ्यासह दोन अपील प्राधिकरणांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिसूचना सरकारने काढली आहे. त्यामुळे इमारत बांधण्याची परवानगी मिळण्यातला विलंब कमी होण्याची अपेक्षा आहे. विकासकांनी अर्ज केल्यापासून अर्जाची छाननी आदी सोपस्कार आटोपल्यानंतर ३० दिवसांत संबंधित विकासकाला इमारत बांधण्याची परवानगी देण्यात येईल, असे परिपत्रक सरकारने जुलै २०१७ मध्ये काढले. त्यामुळे परवानगी लवकर मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र परवानगी मिळतच नव्हती. शिवाय संबंधित विभाग परवानगी देण्यास विलंब करत असतील तर कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न कायम होता.

# दहशतवादाचा धोका कायम

## सागरी मार्गाने अतिरेकी भारतात घुसण्याची भीती


**मुंबई-** सागरी मार्गाने घुसून भारतात दहशतवादी हल्ल्याचा धोका अद्याप कायम आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मच्छीमारांच्या जहाजांची ओळख पटविणारी यंत्रणा अद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले. मोठ्या जहाजांवर अशा प्रकारच्या यंत्रण बसविण्यात आल्या आहे, परंतु छोट्या बोटी व होड्यांमध्ये अद्याप अशी यंत्रणा उभारण्यात आले नसल्याचे, नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाइस अ‍ॅडमिरल गिरीश लुथरा यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, २६/११च्या दहशतवाद्यांनी छोट्या बोटीतूनच हल्ला केला होता.

नौदल दिनाच्या पार्श्वभूमीवर भारताची विमानवाहू युद्धनौका 'आयएनएस विक्रमादित्य'वर आयोजित पत्रकार परिषदेत गिरीश लुथरा बोलत होते. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर जहाजांवर



ओळख पटविण्याची अद्ययावत यंत्रणा उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. खलाशी व मच्छीमारांना बायोमेट्रिक ओळखपत्र देण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. आतापर्यंत ७० ते ८० टक्के मच्छीमारांना बायोमेट्रिक कार्ड देण्यात आले आहेत. मोठ्या व मध्यम आकाराच्या जहाजांची ओळख पटविणे, नौकांच्या येण्या-जाण्यावर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारण्यात आली आहे. मात्र, छोट्या बोटी व होड्यांवर अद्याप अशी यंत्रणा बसविण्याचे काम शिल्लक आहे.

भारतीय नौदलाचे सागरी वर्चस्व वाढत आहे. बदलती जागतिक समीकरणे, नव्याने येणाऱ्या आव्हानांच्या अनुषंगाने भारतीय नौदलानेही आपले धोरण बदलले. पूर्वी हिंदी महासागरात वर्चस्व असलेले भारतीय नौदल आता त्या पलीकडच्या समुद्राची मुशाफिरी करत आहे.



# कोर्टबाजीने रखडली चार पुलांची कामे

**मुंबई-** हँकॉकसोबत धारावीत मिठी नदीवर तसेच विक्रोळी रेल्वे उड्डाणपूल व अंधेरी लोखंडवाला यारी रोड उड्डाणपुलाचेही काम केले जाणार आहे. मात्र, कंत्राटदाराच्या कोर्टबाजीमुळे या पुलांची कामे मागील दीड वर्षांपासून रखडली आहेत. हँकॉक व यारी रोडचे काम जे. कुमार व मिठी नदी आणि विक्रोळी पुलाचे काम आर. पी. शाह यांना मंजूर झाले. रस्ते घोटाळा उघडकीस येण्यापूर्वी ही कंत्राटे मंजूर झाल्याने पालिकेने आक्षेप घेतला नाही. मात्र, याप्रकरणी उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर न्यायालयाने घोटाळेबाज कंत्राटदारांना कामे देण्यास मनाई करत ही कंत्राटे रद्द केली. त्यानंतर जे. कुमार या कंत्राटदाराने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. आता एल्फिन्स्टन रोड दुर्घटनेनंतर हँकॉक पुलाचा मुद्दा पुन्हा चर्चेत झाला आहे. पालिकेने एकीकडे हँकॉकसह इतर तीन पुलांसाठी सर्वोच्च न्यायालयात जाऊन 'हे पूल लोकहितासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे', असा मुद्दा मांडण्याचे ठरवले आहे.

दुसरीकडे, पुलांसाठी या महिन्यात निविदा प्रक्रिया सुरू करण्याचेही निश्चित केले आहे. हे काम मुंबईकरांच्या हिताचे असल्याने उच्च न्यायालयाने सकारात्मक निर्देश पालिकेला दिले असल्याची माहिती पालिकेच्या पूल व वाहतूक विभागाचे चीफ इंजिनीअर शीतलाप्रसाद कोरी यांनी दिली.

या चार पुलांपैकी हँकॉक पुलासाठी ३५ ते ३६ कोटी रुपये खर्च येणार असून हँकॉकसह विक्रोळी, मिठी नदी, लोखंडवाला येथील पुलांसाठी १४० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

# महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिक असुरक्षितच

**मुंबई-** हत्या, जबरी चोरी, दरोडा किंवा फसवणूक अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक, वृद्धांना सहज लक्ष्य करता येते. देशभरातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वृद्धांना गुन्हेगारांनी सर्वाधिक लक्ष्य केल्याचे वास्तव नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या अर्थात राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालातून समोर आले आहे.

गेल्या तीन वर्षांची आकडेवारी पाहता देशभरात वृद्धांवर होणाऱ्या गुन्ह्यांचा आलेख चढा आहे. ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, त्यांच्या तक्रारींना गांभीर्याने घ्या, त्यांच्याविरोधातील गुन्ह्यांची उकल प्राधान्याने करा, अशा सूचना आणि आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून देऊनही महाराष्ट्र या परिस्थितीला अपवाद ठरलेला नाही. राज्यात गेल्या वर्षी वृद्धांबाबतच्या ४६९६ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. २०१५मध्ये ४५६१ आणि २०१४मध्ये ३९८१ इतके गुन्हे नोंद होते. अन्य राज्यांच्या तलनेत वृद्धाबाबतचे सर्वाधिक गुन्हे महाराष्ट्रात नोंद झाले आहेत.

एक लाख लोकसंख्येच्या तुलनेत वृद्धांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या गुन्ह्यांचे देशभरातील सरासरी प्रमाण २०.६ इतके आहे. महाराष्ट्रात ते ४२.३ आहे. प्रमाणाच्या तुलनेत महाराष्ट्र सहाव्या स्थानी आहे. तर चंदिगढ, मध्य प्रदेश, दिल्ली, आंध्र प्रदेश, छत्तीसगढमध्ये हे प्रमाण महाराष्ट्रापेक्षा जास्त आढळते.

महाराष्ट्रातील वृद्धांविरोधातील एकूण गुन्ह्यांमध्ये फसवणूक, गंभीर स्वरूपाची मारहाण, जबरी चोरी, आणि दरोडा या प्रकारचे गुन्हे जास्त घडले आहेत. विशेष म्हणजे देशात घडलेल्या या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. उदाहरणार्थ देशात वृद्धांच्या फसवणुकीचे १९४१ गुन्हे नोंद झाले. त्यात २२०३ वृद्धांची फसवणूक घडली. त्यापैकी ८०० गुन्हे एकट्या महाराष्ट्रात घडले आहेत. ३९ दरोड्यांपैकी १६,९२० हत्यांपैकी



२,९०,१०२४ जबरी चोरीच्या गुन्ह्यांपैकी ४१६ गुन्हे महाराष्ट्रात घडले. हत्या व हत्येचा प्रयत्न या गुन्ह्यांत महाराष्ट्र दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्राच्या खालोखाल मध्य प्रदेश, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यांमध्ये वृद्धांविरोधातील गुन्ह्यांची संख्या जास्त आढळते.

# चोरीचा मुद्देमाल शोधण्यात महाराष्ट्राची कामगिरी खराब!

**मुंबई-** गुन्ह्यांची उकल करण्यात राज्याची कामगिरी फार काही चांगली नसतानाच चोरीचा मुद्देमाल शोधण्यातही राज्य पोलिसांची कामगिरी समाधानकारक नाही, अशी माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालात प्रसिद्ध करण्यात आली आहे. चोरीचा मुद्देमाल शोधण्याचे प्रमाण महाराष्ट्रात ७.९ टक्के आहे. देशाचे सरासरी प्रमाण १५ टक्के आहे. महाराष्ट्रात चोरीचा मुद्देमाल शोधून काढण्याचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीच्या निम्मेच आहे.



महाराष्ट्राला दुहेरी आकड्याची सरासरी गाठता आलेली नसताना तामिळनाडूमध्ये हे प्रमाण ६६.९ टक्के आहे. २०१५च्या तुलनेत गेल्या वर्षी (२०१६) चोरीचा मुद्देमाल शोधून काढण्याचे प्रमाण वाढले आहे ही तेवढीच समाधानाची बाब. २०१५ मध्ये हे प्रमाण ५.१ टक्के एवढेच होते. यंदा त्यात जवळपास तीन टक्क्यांनी वाढ झाली आहे. तामिळनाडूच्या तुलनेत महाराष्ट्राची कामगिरी फारच कमी आहे.

# परप्रांतीय भटका कुत्रा, संजय निरुपम यांच्या घराबाहेर मनसेचं वादग्रस्त होर्डिंग

**मुंबई -**फेरीवाल्यांची बाजू घेत मनसेशी दोन हात करण्याची भाषा करणारे काँग्रेस नेते संजय निरूपम यांना पुन्हा एकदा मनसैनिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. मुंबईतील काँग्रेस मुख्यालयाची तोडफोड करून शुक्रवारी सकाळीच मनसेने निरूपम यांना 'इट का जवाब पथ्थर से मिलेगा' असा इशारा दिला होता. त्यानंतर निरूपम यांनी ट्विटरवरून हल्ल्याचा निषेध करत मनसैनिकांना भ्याड, नपूंसक आणि लुख्खे म्हटले होते. या सगळ्या प्रकाराला शुक्रवारी मध्यरात्री मनसेने निरूपम यांना पुन्हा इंगा दाखवला. वांद्रे येथील काँग्रेसच्या कार्यालयावर मध्यरात्री शाईफेक करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी




येऊन परिसराची पाहणी केली. मात्र, हे कृत्य नेमके कुणी केले, याचा शोध अजूनही लागलेला नाही. त्यामुळे पोलिसांकडून कुणालाही ताब्यात घेण्यात आलेले नाही. मनसेनेही अजून या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. परंतु, गेल्या काही दिवसांतील एकंदरच घटनाक्रम पाहता हा शाईहल्ला मनसेच्याच कार्यकर्त्यांनी केल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय, संजय निरूपम यांच्या निवासस्थानाबाहेरही मनसेकडून वादग्रस्त पोस्टर्स लावण्यात आली आहेत. या पोस्टर्सवर निरूपम यांच्यावर शेलक्या शब्दांमध्ये टीका करण्यात आली आहे. त्यामुळे आता मनसे आणि काँग्रेस यांच्यातील वाद आणखीनच पेटण्याची शक्यता आहे.

# डहाणू-विरार लोकल बोरीवलीपर्यंत

**मुंबई -** पश्चिम रेल्वेवर डहाणू ते विरारमध्ये चालणारी लोकल थेट बोरिवलीपर्यंत विस्तारित करण्याचा निर्णय घेण्यात



आला आहे. १ डिसेंबरपासून ही सेवा सुरू होणार असून त्यामुळे थेट डहाणूहून मुंबईकडे येणाऱ्या प्रवाशांना मेमूचा आधार मिळणार आहे. या सुविधेमुळे डहाणू ते विरारपर्यंत मेमू आणि त्यापुढे लोकलचा प्रवास टळणार असल्याने शेकडो वेळ वाचणार आहे. परतीच्या मार्गावरदेखील बोरीवली ते डहाणूपर्यंत मेमू चालविली जाणार आहे. पश्चिम रेल्वेने चर्चगेट ते विरारपर्यंतचा लोकलचा विस्तार डहाणूपर्यंत केला आहे. या परिसरातील प्रवाशांना लोकलप्रमाणेच मेमूचा आधारही मिळत आहे. पण मेमूची सेवा विरारपर्यंत मर्यादित असल्याने डहाणू ते विरारपर्यंतच्या प्रवाशांना मुंबई गाठण्यासाठी पुन्हा विरारहून लोकलचा पर्याय स्वीकारावा लागत होता. ही अडचण लक्षात घेत पश्चिम रेल्वेने मेमूचा बोरीवलीपर्यंत विस्तार केला आहे.

# २०९ गाळे विक्रीविना पडून

**मुंबई- म्हाडाच्या इमारतींमधील व्यावसायिक गाळे हे म्हाडाचा आर्थिक कणा म्हणून ओळखले जातात. मात्र तब्बल २०९ व्यावसायिक गाळे अनेक वर्षांपासून विक्रीविना बंद अवस्थेत पडून आहेत. त्यामुळे म्हाडाला कोट्यवधींच्या महसूलावर पाणी सोडावे लागत आहे.**

मुंबईत म्हाडाच्या गृहनिर्माण वसाहती निर्माण करताना या वसाहतींमध्ये व्यावसायिक गाळेही बांधण्यात येतात. म्हाडाच्या घरांची लॉटरी काढली जाते, तर गाळ्यांच्या विक्रीसाठी निविदा काढतात. म्हाडाच्या इमारतींमध्ये तळमजल्यावर दर्शनी भागात व्यावसायिक गाळे असतात. या गाळ्यांच्या विक्रीतून म्हाडाला सर्वाधिक नफा मिळतो. अत्यल्प उत्पन्न आणि अल्प उत्पन्न गटातील घरांच्या विक्रीतून म्हाडाला नफा मिळत नाही. मध्यम उत्पन्न गटातील घरांच्या विक्रीतून सरासरी दहा टक्के आणि उच्च उत्पन्न गटातील घरांच्या विक्रीतून दहा ते वीस टक्के नफा मिळतो. त्यामुळे व्यावसायिक गाळ्यांची विक्री म्हणजे म्हाडाचा आर्थिक कणा आहे, असे सांगण्यात येते. सध्या मात्र म्हाडाच्या प्रतीक्षानगर, कुर्ला विनोबा भावे नगर, मानखुर्द, तुंगा पवई, मुलुंडचा गव्हाणपाडा, गोरेगावची मजासवाडी, गोरेगावचे बिंबिसार नगर, शास्त्रीनगर, सिद्धार्थ नगर, चारकोप भूखंड क्रमांक एक व चारकोप भूखंड क्रमांक दोन येथील तब्बल २०९ व्यावसायिक गाळे विक्रीविना पडून आहेत. यापूर्वी २०१० मध्ये म्हाडाच्या व्यावसायिक गाळ्यांची निविदा काढून विक्री केली होती. त्यावेळी एका गाळ्याची विक्री सरासरी ४० लाख रुपयांना झाली होती. काही गाळे ७० लाख रुपयांना विकले गेले होते.



# सायबर गुन्ह्यांत आर्थिक राजधानी आघाडीवर

**मुंबई - जास्त नफ्याचे आमिष दाखवून ऑनलाइन फसवणूक, डेबिट-क्रेडिट कार्ड घोटाळे, अश्लील फोटो किंवा मजकूर समाजमाध्यमांवरून प्रसारित करणे अशा प्रकारचे सायबर गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी सुरक्षा यंत्रणा विविध उपाय राबवत आहेत. मात्र यानंतरही देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत सायबर गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असल्याचा अहवाल राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने (नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरो-एनसीआरबी) दिला आहे.**

गतवर्षीच्या आकडेवारीनुसार मुंबई आणि पुणे या शहरातील सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यात अपयश येत असल्याचे दिसत आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने देशातील एकूण गुन्हेगारीविषयक अहवाल गुरुवारी प्रसिद्ध केला. या अहवालानुसार सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यात देशातील अन्य महानगरे यशस्वी ठरत असताना मुंबई, पुण्यात मात्र सायबर गुन्हेगारी गंभीर बनत चालली आहे. देशात माहिती तंत्रज्ञानातील सर्वात आघाडीचे शहर असलेल्या बंगळूरुला मागे टाकून मुंबई यंदा सायबर गुन्हेगारीत अव्वल ठरली आहे. २०१४ आणि २०१५ या वर्षांत सायबर गुन्ह्यांची संख्या बंगळूरुमध्ये सर्वाधिक होती. २०१५मध्ये बंगळूरुत १०४२ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली होती. तर मुंबईत ७७९ गुन्ह्यांची नोंद झाली, परंतु बंगळूरु पोलिसांनी सायबर गुन्हेगारीवर वचक बसवल्याने २०१६मध्ये या शहरात ७६२



सायबर गुन्ह्यांची नोंद झाली. विशेष म्हणजे, २०१६मध्येही मुंबईत ७८० गुन्ह्यांची नोंद झाली. आधीच्या वर्षीच्या तुलनेत मुंबईतील सायबर गुन्ह्यांमध्ये एकाची वाढ झाली आहे. मात्र अन्य शहरांतील गुन्हेगारी नियंत्रणात आल्याने आपसूकच मुंबई याबाबतीत अव्वल क्रमांकावर ढकलली गेली. दुसरीकडे, माहिती तंत्रज्ञानाचे नवे शहर म्हणून विकसित असलेल्या पुण्यातील सायबर गुन्हेगारीत मोठी वाढ झाली आहे. २०१५मध्ये ८५ सायबर गुन्ह्यांची नोंद असताना २०१६मध्ये हा आकडा थेट २६९वर पोहोचला आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण म्हणजे एक लाख लोकसंख्येमागे घडलेले गुन्हे लक्षात घेतले तर मात्र जयपूर, लखनौ, बंगळूरु, पाटणा आणि पुणे ही महानगरे मुंबईच्या पुढे आहेत. राज्यांचा विचार केल्यास सायबर गुन्ह्यांच्या नोंदीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्यावर्षी महाराष्ट्रात २३८० सायबर गुन्हे नोंद झाले.

# संपादकीय...


## आशेची नवी पालवी


संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

गेल्या वर्षी नोटाबंदी झाल्यापासून भारतीय अर्थव्यवस्थेवर एक मळभ दाटले होते. नोटाबंदीने साऱ्या विकासचक्रालाच जबरदस्त खीळ बसल्याचे चित्र निर्माण झाले होते. त्यात तथ्यही होते. याचे कारण रोखीत व्यवहार करणारे सारे छोटे उद्योजक आणि व्यापारी, धंदेवाईक अचानक कोसळलेल्या नोटाबंदीने घायाळ झाले. भारतीय अर्थजीवनावर पडलेला हा घाव जरा सुकतो ना सुकतो तोच साऱ्या व्यवहारांना नवे वळण लावणारी जीएसटी करपद्धती आली. या वस्तू आणि सेवा कराच्या अंमलबजावणीत आजही शंभर टक्के सुसूत्रता आलेली नाही. अशा वातावरणात या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) वाढीच्या वेगाने ६.३ टक्के असा समाधानकारक वेग गाठला आहे. एप्रिल ते जून या तिमाहीत ही टक्केवारी केवळ ५.७ होती. या वेगाने सारे वातावरण मलूल झाले होते. पण नवे आकडे अर्थव्यवस्था सावरत असल्याचे दाखवत आहेत. अर्थव्यवस्थेला उभारी यावी, यासाठी केंद्र सरकारने योजलेल्या उपायांचे यश दिसू लागले आहे, असे अर्थमंत्री अरुण जेटली यांनी म्हटले आहे. ते अंशतःच खरे मानावे लागेल. याचे कारण केवळ एका तिमाहीच्या यशावर विसंबून चालणार नाही. तीन महिन्यांचे दोन टप्पे अजून बाकी आहेत. त्यांतील वाटचालही अशीच राहिली आणि वाढीचा हा वेग सात टक्क्यांच्या आसपास गेला तर एकूण आर्थिक वर्षाची कामगिरी संतोषजनक झाली, असे म्हणता येईल. गेली काही वर्षे आपल्या शेतीच्या वाढीचा वेग फारसा स्पृहणीय नाही. आताही उत्पादन, वीज या क्षेत्रांनी चमकदार झेप घेतली असली तर शेतीने केवळ १.२ टक्के इतकाच वाढीचा वेग नोंदवला. ही काळजी करण्यासारखी बाब आहे. याची दोन कारणे आहेत. एकतर भारतात शेतीवर उपजीविका करणाऱ्या कुटुंबांची संख्या आजही इतर कोणत्याही अर्थक्षेत्रापेक्षा अधिक आहे. शेतीच्या वाढीचा वेग मंद म्हणजे त्यांच्या उत्पन्नातील वाढही मर्यादित. याचा दुसरा परिणाम म्हणजे, शेती आणि तदनुषंगिक व्यवसाय करणारी ग्रामीण जनसंख्या हाच आजही भारतातला सर्वात मोठा ग्राहकवर्ग आहे. त्याच्या हातात जर अधिकचा पैसा खेळला नाही, तर उत्पादन तसेच सेवाक्षेत्राला भरीव पाठबळ मिळत नाही. केवळ शहरी ग्राहकांना वस्तू विकून अथवा सेवा देऊन एकही उद्योग आपल्या हमखास वाढीचे स्वप्न पाहू शकत नाही. तेव्हा उरलेल्या काळात हा शेतीच्या वाढीचा वेग कसा स्थिर करून वाढवता येईल, याकडे केंद्र सरकारने लक्ष देणे अपेक्षित आहे. १९९१ मध्ये डॉ. मनमोहनसिंग यांनी अर्थमंत्री म्हणून नव्या उदार आर्थिक धोरणाचा पाया घातला. त्यानंतर ते स्वतः पंतप्रधान झाल्यानंतरही संरक्षण व परराष्ट्र संबंधांप्रमाणेच एक प्रकारची राष्ट्रीय एकवाक्यता कमी-अधिक प्रमाणात आर्थिक धोरणाबाबत निर्माण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अनावश्यक आक्रमक पवित्र्यामुळे गेल्या तीन वर्षात ही एकवाक्यता अकारण आक्रसली आहे. आता माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी या अर्थवाढीच्या टक्केवारीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. ही चांगली खूण आहे. अत्यंत संवेदनशील अशा आर्थिक पावलांबाबत राष्ट्रीय मतैक्य निर्माण करण्यासाठी पंतप्रधानांनी यापुढे पुढाकार घेतला तर वातावरण बरेच निवळेल. तो सलोखा शेवटी अर्थव्यवस्थेच्या विकासालाच साहयभूत ठरणार आहे.



# संविधान हे केवळ सत्तेचे कायदे ग्रथित केलेले पुस्तक नव्हे तर हा देशधर्मग्रंथ!




शासन हे त्यागी असते. त्यात सर्व प्रकारचे पावित्र्य एकवटलेले असते. ते सर्वज्ञानी असते. एवढेच नव्हे, तर त्यात सर्व विश्वे एकवटलेली असतात असे 'महाभारता'ने ज्याबद्दल म्हटले आहे ती व्यवस्था म्हणजे शासन. आजच्या एकविसाव्या शतकात हे काही आपण जसेच्या तसे स्वीकारू शकत नाही. कारण ही व्याख्या शासनाला दैवत्वाकडेच नेताना दिसते. नृप हा शासक म्हणजे परमेश्वराचा अवतार असा राजकीय विचार प्रबळ असलेल्या काळात कदाचित ते सोयीचेही ठरले असेल, परंतु आज शासन व्यवस्थेला हे दैवी रूप आपणांस ठरवूनही देता येणार नाही. याचे कारण या व्यवस्थेवरील अनेक बंधने आणि नियंत्रणे. ही व्यवस्था कोणतीही, म्हणजे अगदी हुकूमशाही असली, तरी तिच्यावर काही बंधने असतातच. हुकूमशहालाही अंतिमत: लोकांचे मान्यता या अर्थाने 'सँक्शन' असावे लागते. हुकूमशहा हा कितीही मनमानी करणारा असला, तरी आपण कसे लोकहितवादी आहोत हे तो सातत्याने दाखवीत असतो, ते केवळ प्रसिद्धीची हौस म्हणून नव्हे. लोकशाहीची तर गोष्टच वेगळी. तेथे शासन हे भलेही त्यागी, पवित्र, सर्व ज्ञान ज्यात साठवलेले आहे असे मानले गेले, तरी हे शासन चालविणाऱ्या व्यक्तींबाबत तसे कदापि म्हणता येणार नसते. केवळ बहुमताच्या जोरावर ते शासक झालेले असले तरी तेथे सार्वभौम असते ती जनताच. जनतेचे हे सार्वभौमत्व, तिने शासनव्यवस्थेवर घातलेली बंधने आणि नियंत्रणे येतात ती संविधानातून. ही कायद्याच्या राज्याची लोकांनीच लोकांना दिलेली सनद. ती आपण स्वीकारली त्या दिवसाची स्मृती म्हणून आपण दर वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करतो. तसा तोही एका उपचाराचाच भाग. लोकशाहीमध्ये अशा प्रकारचे, जयंत्या-मयंत्यांचे सोहळे करण्यापासून कशा ना कशाचे सप्ताह साजरे करण्यापर्यंतचे अनेक उद्योग आपण करीत असतो. हे एकूणच आपल्या उत्सवप्रियतेला साजेसेच. परंतु संविधान दिन ही केवळ उत्सवी जल्लोषाची बाब असता कामा नये. ती तशी होत असेल, तर ते बदलले पाहिजे हे समजून घेण्याची आवश्यकता आहे. संविधानाविषयीचा आदर, त्यावरील विश्वास ही केवळ एका दिवशी मिरविण्याची गोष्ट नसून, ती नागरिकाच्या दैनंदिन जगण्याचा भाग असला पाहिजे. आज जागतिकीकरणोत्तर काळात नव-आर्थिक-वसाहतवादासारख्या शक्तींचा दबाव देशोदेशीच्या शासनव्यवस्थांवर येत आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या विस्फोटामुळे जग जवळ आल्याचे भ्रम निर्माण होत असतानाच ते अधिकाधिक विलगीकरणाकडे वाटचाल करीत आहे. व्यक्ती आणि टोळ्या असा एक नवाच संघर्ष उभा राहत आहे. अशा स्थितीत सामान्य नागरिकाला आधार उरणार आहे तो संविधानाधिष्ठित शासनव्यवस्थेचाच. तेव्हा जपले पाहिजे ते आपणच आपल्याला प्रदान केलेले संविधान.

परंतु संविधान जपणे म्हणजे काय हेही एकदा नीट तपासून घेतले पाहिजे. याचे कारण आपणा भारतीयांची प्रवृत्ती. श्रद्धेने मान तुकविणे हे आपल्याला फार आवडते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याबाबत आपल्याला यापूर्वीच इशारा देऊन ठेवलेला आहे. घटनासभेसमोर केलेल्या भाषणात त्यांनी हा इशारा दिला होता आकर्षक व्यक्तिमत्त्वासमोर मान तुकविण्याच्या आपल्या प्रवृत्तीबद्दल. धर्मातील भक्ती कदाचित आत्म्याला मोक्ष वगैरे देत असेल, परंतु राजकारणात ती वाट चुकीचीच. तो भक्तिमार्ग स्वीकारणे म्हणजे आपला स्वत:चा अवमान असतोच, परंतु तो हुकूमशाहीला आमंत्रण देणारा असतो. हीच बाब संविधानाबाबतही काही प्रमाणात म्हणता येईल. संविधान हे केवळ सत्तेचे कायदे ग्रथित केलेले पुस्तक नव्हे. ते केवळ राजकीय लोकशाही प्रदान करणारे साधनही नव्हे. त्यातून राष्ट्रीय क्रांतीप्रमाणेच सामाजिक क्रांतीही अपेक्षित आहे. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांप्रति भारतीय संविधानाने जी कमालीची काळजी घेतली आहे ती सामाजिक क्रांतीला पोषक अशीच आहे, ही बाब अनेकदा लक्षात घेतली जात नाही. त्यातूनच व्यक्ती आणि समष्टी यातील संघर्षांचा एक वेगळाच गोंधळ माजविला जातो आणि तो मग हे संविधान हिंदुस्थानच्या भूमीतून उगवलेले नाही, त्यावर पाश्चात्त्य छाप आहे अशा टीकेपर्यंत जातो. वस्तुत: समाज हे एक घटित आहे आणि ते व्यक्तीपासूनच तयार होत असते. तेव्हा व्यक्ती महत्त्वाची हे भारतीय संविधानातील तत्त्व आहे. ते लक्षात घेतले की काय जपायला हवे हे आपल्या ध्यानात येतेच, परंतु त्याबरोबर हेही लक्षात येते, की व्यक्ती ज्या समाजाची घटक असते तो समाज हे काही स्थिर तत्त्व नाही. तो सतत बदलत असतो. विविध बाह्य कारणांनी त्यात अंतर्गत घुसळण होत असते. अशा बदलत्या काळात बदलत्या समाजाचे आणि पर्यायाने त्याच्या शासनव्यवस्थेचे नियमन करायचे असेल, तर संविधानालाही उग्रहट्टी राहून चालणार नसते. त्यातही सुधारण्याची ताकद असली पाहिजे. घटनाकारांनी हे जाणले होते. मुद्दा असा आहे, की आपण ते ओळखून आहोत की नाही? की घटनेकडे श्रद्धेय, पूजनीय पोथी म्हणून पाहत आहोत? तो देशधर्मग्रंथ खरा, परंतु तो 'किताबी' भक्तिमार्गाने जात असेल, तर तेही अयोग्यच. याचा अर्थ असा नाही, की बहुमताचे बळ आहे म्हणून मन मानेल तसे संविधान बदलावे. संविधानाची एक मूलभूत चौकट आहे आणि तिला छेदून कोणालाही त्यात बदल वा सुधारणा करता येणार नाहीत, हे वेळोवेळी स्पष्ट झाले आहेच.

ही मूलभूत चौकट आहे न्यायाची, स्वातंत्र्याची, समानतेची आणि बंधुत्वाची. तिला आधार आहे 'सर्वेपि सुखीनः सन्तु' या सद्विचाराचा. संविधानाद्वारे आपणच आपल्याला ही ग्वाही दिलेली आहे आणि येथील राज्ययंत्रणेलाही त्यापलीकडे जाऊन वागता येणार नाही हे सांगितलेले आहे. तसे प्रयत्न झाले नाहीत वा यापुढे होणार नाहीत असे नाही. या देशाने आणीबाणीसारखा, जेथे घटनेने व्यक्तीला दिलेले मूलभूत अधिकारच स्थगित करण्यात आले असा काळ पाहिलेला आहे. अवघ्या १९ महिन्यांचा तो काळ, परंतु त्याने आपल्यासमोर कोणती संकटे, कशा प्रकारे येऊ शकतात हे दाखवून दिले आहे. परंतु त्या घटनेमुळे देशातील भल्या-भल्या विचारवंतांमध्येही एक भ्रम निर्माण झाल्याचे दिसते. तो म्हणजे येथील संविधानाला, त्याच्या मूलभूत चौकटीला धोका आहे तो केवळ आणि केवळ राज्ययंत्रणेकडूनच. पाशवी बहुमताच्या जोरावर आलेला एखादा राज्यकर्ता लोकांच्या हिताचे नाव पुढे करून संविधानाची चौकट ध्वस्त करील असे ते भय आहे. तसे होऊ शकते. परंतु संविधानाला खरा धोका राज्यकर्त्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीहून अधिक आहे तो जनतेच्या उदासीनतेपासून. डॉ. आंबेडकरांनी वेगळ्या शब्दांत याही बाबतचा इशारा दिलेला आहे. आपणास राजकीय लोकशाही मिळाली एवढ्यानेच समाधानी होऊ नका असे ते म्हणाले होते. त्यांच्या नजरेसमोर भारतातील विषमता होती, श्रेणीबद्ध समाजरचना होती. राजकारणात आपण एक व्यक्ती – एक मूल्य अशी रचना केली. ती आपल्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेत होणार की नाही हा खरा प्रश्न होता. तेथे अशा प्रकारची समता प्रस्थापित झाली नाही, तर राजकीय लोकशाहीचे समाधान अपूर्णच असेल.

# फेरीवाल्यांचा पुन्हा फेरा

## डोंबिवली, अंबरनाथ रेल्वे स्थानक परिसरात 'व्यवसाय' सुरू



**डोंबिवली - अतिक्रमण विभागाच्या आक्रमक कारवाईमुळे गेल्या दोन महिन्यांपासून डोंबिवली आणि अंबरनाथ रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाले गायब झाले होते. मात्र, काही दिवसांपासून डोंबिवली आणि अंबरनाथ स्थानक परिसरात पुन्हा फेरीवाल्यांचे अतिक्रमण वाढू लागले आहे. प्रभाग अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार होत असल्याच्या तक्रारी आहेत.**

मुंबई तसेच डोंबिवली रेल्वे स्थानकाबाहेरील फेरीवाल्यांवरील मनसेने केलेल्या हल्ल्यानंतर अंबरनाथ रेल्वे स्थानकाबाहेरील फेरीवालेही नगरपालिकेच्या पथकांनी हटवले होते. अंबरनाथ पूर्वेला शिवाजी चौकात फेरीवाल्यांनी पुन्हा पथारी पसरली आहे.

याच वेळी डोंबिवली 'ग' प्रभागाचे प्रभाग अधिकारी परशुराम कुमावत हे रजेवर असल्याने त्यांचा पदभार वानखेडे यांना देण्यात आला आहे. या काळात रामनगर, उर्सेकरवाडी, फडके रस्ता, कामत गल्ली परिसर फेरीवाल्यांनी गजबजून गेला आहे. प्रभाग कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार होत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

अंबरनाथ रेल्वे स्थानकाबाहेरील फेरीवाले पालिका प्रशासनाने हटवले होते. मात्र त्या कारवाईला काही दिवस उलटत नाहीत तोच आता अंबरनाथ स्थानकाबाहेर पुन्हा फेरीवाले बसण्यास सुरुवात झाली आहे.

अंबरनाथ पूर्वेला शिवाजी चौक अनेक दिवसांपासून फेरीवाल्यांनी गजबजून गेला आहे. येथे मोजकेच फेरीवाले परतले असून यावर तात्काळ कारवाई न झाल्यास या भागात त्यांची संख्या वाढण्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने या फेरीवाल्यांना हटवण्याची मागणीने जोर धरला आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेपासून हाकेच्या अंतरावर दररोज सकाळ, संध्याकाळ फेरीवाले बसत आहेत. तरीही 'फ' आणि 'ग' प्रभागांकडून कोणतीही कारवाई फेरीवाल्यांवर केली जात नाही. 'फ' प्रभागाचे अधिकारी अमित पंडित यापूर्वी कुमावत यांच्या पाठिंब्याने फेरीवाल्यांना हटविण्यासाठी रस्त्यावर उतरायचे. असे असताना आयुक्तांच्या आदेशानंतरही डोंबिवलीतील फेरीवाले हटविताना महापालिकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. उपायुक्त सुरेश पवार यांचेही आदेश ग आणि फ प्रभागाच्या कामगारांकडून जुमानले जात नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# मनसे पदाधिकाऱ्यांना पोलिसांच्या नोटिसा

**ठाणे** - मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी पाट्यांसाठी आंदोलन छेडण्याचा इशारा दिल्यानंतर फेरीवाला आंदोलनाच्या धर्तीवर मनसेचे पदाधिकारी मराठी पाट्यांसाठी हिंसक आंदोलन करण्याची भीती पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. तसे प्रकार होऊ नयेत, यासाठी पोलिसांनी मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी आंदोलने करू नयेत, असे त्यात बजावण्यात आले असून त्याचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईचा इशाराही त्यात देण्यात आला आहे.



एल्फिस्टन पूल दुर्घटनेनंतर मनसेने रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाल्यांविरोधात आक्रमक आंदोलन केले होते. ठाणे, कल्याण-डोंबिवलीत फेरीवाल्यांना बेदम मारहाण झाली होती. त्या आंदोलनामुळे मनसे विरुद्ध काँग्रेस हा राजकीय वादही आता भलताच पेटला आहे. दोन आठवड्यांपूर्वी ठाण्यात झालेल्या जाहीर सभेत राज ठाकरे यांनी पुन्हा दुकानांवरील मराठी पाट्यांसाठी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. त्यानुसार पाट्यांवर मराठी नावे लिहिण्यासाठी मनसेने मुदत दिली असून त्यानंतर मनसे स्टाईल आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. त्यामुळे मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून तोडफोड किंवा मारहाणहोण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा कोणत्याही आंदोलनात सहभाग आढळल्यास तुम्हाला जबाबदार धरले जाईल. फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये दिलेल्या नोटिशीचा भंग केला म्हणून भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ आणि प्रचलित कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असे त्यात बजावण्यात आले आहे.

# ३.५ लाख शिधापत्रिका ऑनलाइन

**वसई** - वसई-विरार शहरातील साडेतीन लाख शिधापत्रिकांचे संगणकीकरण पूर्ण झाले असून या सर्व शिधापत्रिका ऑनलाइन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. प्रत्येक शिधापत्रिकेवर १२ आकडी क्रमांक टाकण्यात आला असून हाच क्रमांक आता नागरिकांची नवी ओळख राहणार आहे. हा क्रमांक, तसेच आधारकार्डाच्या क्रमांकाने राज्यभरातून प्रत्येक शिधापत्रिकाधारकाची नोंद एका क्लिकववर मिळणार आहे.



राज्यातील सर्व शिधापत्रिका संगणकीकृत करण्याचे राज्य शासनाने ठरवले होते. त्यानुसार वसईच्या पुरवठा शाखेने हे काम सुरू केले होते. सर्व शिधापत्रिकांधारकांची माहिती मिळवून त्यांच्या संगणकात अभिलेख बनवण्यात येत होता. हे काम आता पूर्ण झाले असून ३ लाख ५२ हजार शिधापत्रिकांची संगणकात नोंद करण्यात आली आहे. त्या आधारकार्डाशी संलग्न करण्यात आल्या आहेत. या प्रत्येक शिधापत्रिकेवर १२ आकडी क्रमांक देण्यात आला आहे. या क्रमांकाने प्रत्येक नागरिकांची माहिती एका क्लिकवर मिळेल, असे पुरवठा विभागाचे प्रमुख नायब तहसीलदार प्रदीप मुकणे यांनी सांगितले. दररोज १००हून अधिक नव्या शिधापत्रिका बनवण्याचे काम सुरूच असून त्यासाठी खास कक्ष उभारण्यात आला आहे.

वसई विरार शहराची लोकसंख्या २० लाखांच्या घरात आहे. सध्या वसई-विरार शहरात साडेतीन लाख शिधापत्रिकाधारक आहेत. त्यातील एक लाख १३ हजार शिधापत्रिकाधारक प्राधान्य कार्ड वर्गवारीत (केसरी शिधापत्रिका) आहेत. वसई-विरार शहरात धान्य आणि केरोसिन वाटप करण्यासाठी १७९ शिधाकेंद्रे आहेत.

***शिधापत्रिकाधारकांना स्मार्टकार्ड***

शिधापत्रिकांची संगणकात नोंद झाल्यानंतर आता शिधापत्रिकाधारकांना स्मार्टकार्ड देण्यात येणार आहे. नवीन वर्षापासून नागरिकांना स्मार्टकार्ड शिधापत्रिका वाटप केल्या जाणार आहेत. या स्मार्ट शिधापत्रिका एटीएम कार्डाच्या आकाराच्या असतील आणि पाकिटात मावू शकतील. त्या टिकाऊ असल्याने ग्राहकांची मोठी सोय होणार आहे. अनेकदा शिधापत्रिका फाटतात, त्याची पाने गहाळ होतात आणि मग अनेक समस्या निर्माण होतात. त्या त्रासापासून मुक्तता होणार आहे. स्मार्टकार्डची नोंद ऑनलाइन राहणार आहे. त्यामुळे गरजू कुटुंबाला धान्य मिळाले की नाही त्याची नोंद पुरवठा खात्याकडे राहणार आहे.

# मुरबाड आणि भिवंडी तालुक्यात 'प्लास्टिक'चे रस्ते



**ठाणे** - डांबरी, सिमेंट काँक्रिट, अल्ट्रा थीन व्हाइट टॅपिंग, खाली काँक्रिटचा थर आणि वर डांबरी रस्ता असे अशा 'टिकाऊ' रस्त्यांची परंपरा ठाणे जिल्ह्यात आहे. त्या वादग्रस्त परंपरेत आता नव्या प्रयोगाची भर पडणार आहे. अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याचा वापर रस्त्याच्या उभारणीसाठी केला जाणार आहे. मुरबाड आणि भिवंडी तालुक्यात उभारल्या जाणाऱ्या या सुमारे १५ किमी लांबीच्या या रस्त्यांसाठी १२ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

गेल्या काही वर्षांत प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. प्लास्टिकचे कचऱ्याचे विघटन होत नाही. त्यामुळे नदी-नाले तुंबतात, शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते. त्यावर मात करण्यासाठी प्लास्टिक वापरावर बंदी आणण्याचे प्रयत्नही फारसे यशस्वी होताना दिसत नाही. परंतु, प्लास्टिकचा वापर विधायक पद्धतीने करण्यासाठी जगभरात विविध प्रयोग केले जात असून रस्त्यांच्या उभारणीत प्लास्टिकचा वापर करणे हा त्याच प्रयत्नांचा एक भाग आहे. अविघटनशील प्लास्टिक कचऱ्याच्या विघटन करून त्याचा वापर रस्त्याच्या डांबरीकरणाच्या अस्तरीकरणामध्ये करून ठाणे जिल्ह्यातील दोन रस्त्यांचा विकास करण्याचा निर्णय राज्य सरकारने दोन दिवसांपूर्वी घेतला आहे.

राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाच्यावतीने जी पंतप्रधान ग्रमसडक योजना राबवली जाते, त्यातील संशोधन व विकास योजनेअंतर्गत अंतर्गत या रस्त्याचा दर्जा सुधारण्याचे हे प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले. रस्त्यांना प्लास्टिक कोटींगचे अस्तरीकरण करण्यात येणार असून अशा स्वरूपाचा हा ठाणे जिल्ह्यातला पहिलाच प्रयोग असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# अतिक्रमण विभागाची नेरुळमध्ये कारवाई



**नवी मुंबई** - नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेकायदा बांधकामाविरोधात महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाने धडक कारवाई हाती घेतली आहे. त्यानुसार बुधवारी नेरूळ विभागात कारवाई करण्यात आली. यात बेकायदा झोपड्या आणि दुकानांसमोरील अतिरिक्त जागेचा(मार्जिनल स्पेस)चा बेकायदेशीरपणे वापर करणाऱ्यांचा देखील समावेश आहे.

शहरात फेरीवाल्यांचा प्रश्न निर्माण बिकट झाला असताना नेरुळ परिसरात दुकांनासमोरील अतिरिक्त जागेचा गैरवापर दुकांनदाराकडून केला जात होता. यामुळे नेरुळ सेक्टर ११ येथील पदपथांवरून नागरिकांना चालणेदेखील कठीण झाले होते. याविरोधात पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली. जवळपास २५ दुकांनासमोरील अतिक्रमण यावेळी हटविण्यात आले. त्याचबरोबर शिरवणे नागरी आरोग्य केंद्रामागील जागेत असलेल्या ३० झोपड्यादेखील निष्कासित करण्यात आल्या. तर सेक्टर २४ येथील सोसायटीतील बेकायदा बांधकामदेखील पाडण्यात आले.

नेरुळ विभागातील झोपड्या तसेच दुकानासमोरील जागेचा बेकायदेशीरपणे वापर केला जात असल्याच्या तक्रारीनंतर नेरुळ विभागात कारवाई करण्यात आली असून भविष्यात अतिक्रमणाविरोधातील ही कारवाई अधिक तीव्र केली जाणार आहे.

# कल्याणात ९ लाखांची लूट

**ठाणे** - पादचाऱ्यांच्या गळ्यातील साखळ्या व मंगळसूत्रचोरांना पोलिस पकडण्यात अपयशी ठरत असताना कल्याणात बँकेबाहेरून तब्बल ९ लाखांची रोकड लुटून नेल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी घडला. याप्रकरणी खडकपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कोनगाव येथील अर्षद अन्सारी व त्यांचा सहकारी इरफान अन्सारी हे दोघे कल्याण येथील खडकपाडा भागातील ॲक्सिस बँकेत रोकड जमा करण्यासाठी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास आले होते. त्यांनी बँकेत १ लाख रुपये जमा केले व उर्वरित ९ लाख रुपये घेऊन ते कोन येथे परतण्यासाठी निघाले. परंतु त्यावेळी त्यांच्याकडील ९ लाखांची रोकड बाइकवरून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी हिसकावून तेथून पळ काढला. याप्रकरणी अर्षद अन्सारी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अद्याप आरोपींचा छडा लागलेला नाही. मात्र दिवसाढवळ्या झालेल्या या प्रकाराने चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही, हे पुन्हा उजेडात आले आहे.

# आदिगुरू - श्री दत्तात्रेय

**भगवान शंकर, श्री दत्तात्रेय, श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या पवित्र भूमीत थोर ऋषीमुनी, साधुसंतांनी जन्म घेतला आणि साऱ्या जगाला आध्यात्माची दीक्षा देऊन उपकृत केले. आज हजारो वर्षे होऊनही ते आपल्या विस्मरणातून गेले नाहीत. सर्वसामान्य माणसाला प्रपंच करून परमार्थ साधता येत नाही आणि घराचे रूपांतर आश्रमात करता येणे शक्य नाही. म्हणून ऋषींना व महासती अनुसूयेचा आदर्श सतत डोळ्यासमोर ठेवला तर ते शक्य आहे.**



दत्त सांप्रदायाची महाराष्ट्र ही जन्मभूमी आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व गोवा या भागांमध्ये श्रीदत्तात्रेय हे सर्वाधिक लोकप्रिय दैवत आहे. भक्ताच्या हाकेला 'ओ' देणारे दैवत आहे.

सती अनुसूयेच्या व अत्री ऋषींच्या अघोर तपश्चर्येस भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होऊन अनुसूयेच्या पोटी मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला. म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रात साजरा होत असतो.

दत्त ही देवता म्हणजे ब्रहम-विष्णू-महेश या तिघांच्या एकरूपतेचे प्रातिनिधिक स्वरूप असून सत्व, रज आणि तम या त्रैगुणांचे एकत्रीकरण तिच्यात झालेले आहे. श्री दत्तात्रेयाच्या सर्व मूर्तीमधून दिसणारी त्यांची तीन तोंडे म्हणजे ब्रहम-विष्णू व महेश. त्यांच्यामागे उभी असलेली गोमाता व चार श्वान ही अनुक्रमे पृथ्वी व चार वेद यांची सूचक आहे.

दत्तजयंती उत्सव महाराष्ट्रात विशेष करून साजरा होतो. यात नवल नाही. महाराष्ट्र हा कृषीप्रधान देश असून दत्ताचा एकूण पेहराव शेतकऱ्यांच्या दैवतेसारखा किंवा सेवकासारखा असतो. तो औदुंबराच्या झाडाखली राहतो व एक प्रकाराने औदुंबराच्या जपणुकीने तो वर्ण विस्ताराची शिकवणूक शेतकऱ्यांना देत असतो. त्यांच्या पाठीशी गाय असते. शेतीधंद्यात पूरक उद्योगधंदा म्हणून दुग्धोत्पादनाची कास धरण्यात येते. जणू काही हे व्रत श्रीदत्तराजानेच शेतकऱ्यांना शिकवले आहे. दत्ताच्या पायाशी कुत्रे असते. शेतीची राखण करावयास व घरादाराची जपणूक करावयास कुत्र्याचे सहाय्य शेतकऱ्याला होत असते.

श्री दत्तात्रेयांनी या पृथ्वीवर विविध कारणास्तव १६ अवतार घेतले आहेत. १) योगीराज, २) अत्रिवरद, ३) दत्तात्रेय, ४) कालग्निशमन, ५) योगिराज वल्लभ, ६) लीला विश्वंभर, ७) सिद्धराज, ८) ज्ञानसागर, ९) मायामुक्त, १०) आदिगुरू, ११) मायायुक्त, १२) शिवरूप, १३) विश्वंभर, १४) देवदेवं, १५) दिगंबर व १६) कृष्णश्याम-कमलनयन.

या अवतारांच्या कथा वर्णन करणारा संस्कृत ग्रंथ श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी लिहिला असून त्याचे नाव 'श्री दत्तात्रेय षोडशोवतार' असे आहे. या सोळा अवतारांशिवाय दासोपंथ हा एक सतरावा आणि सर्वज्ञ अवतार मानण्यात येतो.

श्रीदत्त मूर्ती तपमग्न, शांत, फार कृशही नाही व फार लठ्ठही नाही. ती वाल्मिकीप्रमाणे जटाभाराने युक्त अशी आहे. दत्तगुरूंनी २४ गुरूंकडून २४ गुणांची जोपासना प्राप्त करून साधक मार्गात खडतर वाटचाल केली. प्रत्येक वास्तूंच्या ठिकाणी गुण व अवगुणही असतात. वाईट ते सोडून देऊन वैराग्याची वृद्धी करणारे जे गुण होते, ते सद्गुण समजून त्याची वृद्धी केली. त्यांना ज्यांच्या ज्यांच्याकडून मार्गदर्शन लाभले, त्या सर्वांना त्यांनी गुरू केले. क्षूद्र कीटकापासून ते पंचमहाभूतांपर्यंत बोध घेता येतो, हे त्यांनी आपल्या भक्तांना दाखवून दिले. पूर्वजांच्या त्रासापासून रक्षण होण्यासाठी दत्तात्रेयाचा नावजप केल्यावर खऱ्या अर्थाने पितरांना गती मिळून आपण पितृऋणांतून काही प्रमाणात मुक्त होऊ शकतो. कलियुगात दत्तात्रेयाची उपासना आवश्यक आहे. त्यांच्या चरणाची मनोभावे सेवा केली तर भक्तास त्यांच्या कृपाप्रसादाचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही. साधकाला योग्य अशा सद्गुरूची भेट करून देण्याचे कार्य हे दैवत आज हजारो वर्षे गुप्त व प्रगट स्वरूपात करत आहे. त्यामुळे श्री दत्तात्रेय यांना आदिगुरू म्हटले आहे. उपनिषदकारांनी एक पाऊल पुढे जाऊन त्यांना 'विश्वगुरू' म्हटले आहे.

त्रिमुखी दत्तात्रेयातील ब्रह्मच्या हातात जपमाळ असते. त्यामुळे दत्ताचा नामजप सतत सुरू असतो. ही देवता सदैव आपल्या शिष्यांवर दया करणारी, त्यांनी केलेल्या चुकांबद्दल क्षमा करणारी व दुष्ट दैत्यांपासून त्यांना अभय देणारी अशी ही देवता आहे. काही ठिकाणी तिला विष्णूचा सहावा अवतार, तर काही ठिकाणी चौथा अवतार मानले आहे.



## दत्ताचे २४ गुरु

**सूर्य-** ज्याप्रकारे सूर्य एकच असून वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या रूपात दिसतो, तसीच आत्माही एकच आहे, परंतू तिचे अनेक रूप बघायला मिळतात. तसेच सूर्य जलाचा संचय करून परोपकारार्थ त्याचा भूमीवर वर्षाव करतो त्याप्रमाणे मनुष्याने उपयुक्त संचय करून सर्वांना त्यांचा लाभ द्यावा.

**पृथ्वी-** पृथ्वीने आम्ही सहनशीलता व परोपकाराची भावना शिकू शकतो.

**पिंगला वेश्या-** दत्ताने पिंगला नावाच्या वैश्याहून ही शिक्षा घेतली आहे की केवळ पेश्यासाठी जगू नाही. धनाच्या कामनेत जेव्हा ती एक रात्री कंटाळली तेव्हा अचानक तिच्या मनात वैराग्य आला. तेव्हा तिला जाणीव झाली की खरं सुख पेश्यात नाही परमात्म्याच्या ध्यानात आहे. तेव्हा कुठे जाऊन ती सुखाची झोप घेऊ शकली.

**कबूतर-** देवाने जेव्हा बघितले की कबूतराचे जोडपे आपल्या मुलांना जाळेत अडकलेलं बघून स्वत:ही जाळेत जाऊन फसलं, तेव्हा ही शिक्षा मिळाली की अती स्नेह दुःखाचे कारण असतं.

**वायू-** जसे जागा चांगली असो या वाईट, वायूचे मूल रूप स्वच्छताच आहे, तसेच आमच्यासोबत चांगले लोकं असो वा वाईट आम्हाला आपला चांगुलपणा सोडायला नको.

**मृग-** मृग आपल्या मस्तीत क्षुब्ध होऊन इतका धुंद होऊन जातो की त्याला मस्तीत तो आपले प्राण परस्वाधीन करतो. याने ही शिक्षा मिळते की कधीच मोहात अडकून बेपर्वा होऊन नाही.

**समुद्र-** समुद्रच्या लाटा निरंतर गतिशील असतात, तसेच जीवनातील चढ- उतारात आम्हाला खूश आणि गतिशील राहायला हवे.

पतंगा- जसे पतंगा आगीकडे आकर्षित होऊन जळून जातो, तसेच रंग-रूपाच्या आकर्षण आणि खोट्या मोहात अडकले न पाहिजे.

**हत्ती-** जसं काष्ठाच्या हत्तिणी सन्निध येण्यासाठी हत्ती विषयसुखलालसेने लुब्ध होऊन खड्ड्यात पडतो आणि सहजपणे मनुष्याच्या हातात सापडतो त्यापासून हे शिकण्यासारखे आहे की तपस्वी पुरुषाने आणि संन्यासी स्त्रीने दूर राहिले पाहिजे.

**आकाश-** प्रत्येक परिस्थिती आणि काळात मोहापासून दूर राहण्याची शिक्षा आकाशाकडून मिळते.

**पाणी-** मनुष्याने पाण्याप्रमाणे नेहमी मधुर आणि पवित्र राहावे.

**मधमाशी-** मधमाशी पुष्कळ कष्ट करून पोळे बनवून त्यात मध साठवते परंतू एक दिवस मधुहा अचानक येऊन पोळ्यासह मध घेऊन जातात. याने शिक्षा मिळते की आवश्यकतेहून अधिक संचय करणे योग्य नाही.

**मत्स्य-** लोखंडाच्या गळाला मांस पाहून जशी मासोळी भुलल्यामुळे मांस खायले जाते आणि आपल्या प्राणास मुकते त्याचप्रमाणे आम्हाला जिव्हेच्या स्वादाला अधिक महत्त्व द्यायला नको. आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहार घ्यावा.

**टिटवी-** ज्याप्रकारे एक टिटवी चोचीत मासा धरून असते आणि ते पाहून इतर पक्षी ते मास हिसकवण्याचा प्रयत्न करतात, आणि शेवटी मासाचा तुकडा सोडल्यावरच तिला शांती मिळते. तसेच आम्हाला स्वत:कडे अधिक वस्तू संजय करून ठेवण्याचा अट्टहास करायला नको.

## श्री दत्तगुरूंचे २४ गुण-गुरु




**बालक-** जसे लहान मुलं चिंतामुक्त आणि प्रसन्न दिसतात तसेच आम्हाला चिंतामुक्त आणि नेहमी प्रसन्न राहण्याचा प्रयत्न करायला हवा.

**अग्नी-** परिस्थिती कशीही असो, त्या परिस्थितीत स्वत:ला समायोजित करणे योग्य ठरतं.

**चंद्र-** जसे चंद्राला अमावास्या आणि पौर्णिमा आल्यावरही अर्थात कलेत उणे-अधिकपणा असून त्याचा विकार त्याला बाधक होत नाही, तसेच आत्म्यास देहासंबंधीचे विकार बाधक होत नाहीत.

**कुमारिका-** देवाने बघितले की एकदा एक कुमारिका धान्य कुटत होती. तेव्हा तिच्या हातात असलेल्या बांगड्यांच्या आवाजामुळे बाहेर बसलेले पाहुणे परेशान होत होते. बांगड्यांचा आवाज बंद करण्यासाठी तिच्या बांगड्या फोडून दिल्या गेल्या आणि दोन्ही हातात केवळ एक-एक बांगडी राहू दिली. नंतर कुमारिकेने आवाज केल्याविना धान्य कुटून घेतले अर्थात आम्हालाही एका बांगडीप्रमाणे एकटे आणि निरंतर वाढत राहण्याची प्रवृत्तीसह जगायला हवं.

**तीर तयार करणारा कारागीर-** दत्त देवाने एक असा तीर बनवणारा बघितला जो आपल्या कामात एवढा मग्न होता की त्याच्या जवळून राजाची स्वारी निघून गेली तरी त्याचे कामावरून लक्ष वेधीत झाले नाही. अत: आम्हाला अभ्यास आणि वैराग्याने मनाला वश करावे.

**साप-** देवाने सापाकडून ही शिकले की संन्यासीसारखे जगावे. जसे दोन साप कधीही एकत्र फिरत नाही तसेच दोन बुद्धिमत्तांनी कधी एकत्र फिरू नये. कोणत्याही एका जागेवर न थांबता इकडे- तिकडे विचरण करत ज्ञानाचा प्रसार करावा.

**कोळी-** कोळी तंतूने घर बनवून त्यात क्रीडा करतो आणि त्या घरास गिळून मोकळा होता, तसेच ईश्वर मायेने सृष्टीची रचना करतो आणि मनास येईल तेव्हा नाश करतो. अर्थातच जगातील घटनांना अधिक महत्त्व देऊ नये.

**भ्रमरकीट-** भ्रमराचे ध्यान करणारा किडा जसा स्वतः भ्रमरपणाला पावतो तसेच एकनिष्ठपणे परमात्म्याचे चिंतन करणारा त्याला पावतो.

**भ्रमर-** सूर्यविकासी कमळे सूर्य मावळताच मिटतात. अशा वेळी भ्रमर त्यावर आरूढ असला म्हणजे कमळाच्या पोटात बंधन पावतो. यावरून 'विषयासक्तीने बंधन प्राप्त होते', हे जाणून विषयांत आसक्ती बाळगू नये.

**भुंगा-** याकडून देवाने शिकले की जिथे सार्थक गोष्टी शिकायला मिळतील त्या तत्काल ग्रहण कराव्या, ज्याप्रकारे भुंगा वेगवेगळ्या फुलांतून पराग घेतो.

**अजगर-** अजगराकडून हे शिकायला मिळाले की जीवनात संतोषी बनून राहावे. जे मिळेल ते सुखसमाधाने स्वीकार करणेच आपले धर्म समजावे.

# १३७ उमेदवारांवर गंभीर गुन्ह्यांची नोंद

**अहमदाबाद-** गुजरात विधासभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यात ९७७ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील ९२३ उमेदवारांचे विश्लेषण केले असता, १३७ उमेदवारांविरोधात गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यात खून, अपहरण, बलात्कार यांचे आरोप असल्याचे दोन स्वयंसेवी स्वंस्थांनी केलेल्या विश्लेषणात उघड झाले आहे. जवळपास १५ टक्के उमेदवार असे आहेत. असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स व गुजरात इलेक्शन वॉच या संस्थांनी विश्लेषण केले. भाजपच्या ८९ पैकी १० उमेदवारांविरोधात गंभीर गुन्हे आहेत. तर काँग्रेसचे असे २० उमेदवार आहेत. ५४ उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र अपुरे असल्याने त्याचे विश्लेषण करता आले नाही असे गुजरात इलेक्शन वॉचचे पंकज जोग यांनी स्पष्ट केले. संयुक्त जनता दलाचे माजी आमदार छोटू वसावा यांचा मुलगा




महेश याच्याविरोधात सर्वाधिक २४ गुन्हे आहेत. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ९९७ उमेदवारांपैकी १९८ म्हणजेच २१ टक्के उमेदवार करोडपती आहेत. त्यापैकी ६० जणांनी आपली मालमत्ता पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. राजकोट पश्चिममधील काँग्रेस उमेदवार इंद्रनील राजगुरू हे सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. त्यांनी १४१.२२ कोटी रुपयांची मालमत्ता जाहीर केली आहे.

चौफेर टीका होऊनही देश आत्मविश्वासाने पुढे जात असून चारही बाजूंनी चांगल्या बातम्या येत आहेत अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील निकालावर व्यक्त केली. गुजरात विधानसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधानांनी साडेसात हजार महिला कार्यकर्त्यांशी नमो ॲपच्या माध्यमातून संवाद साधला. जनतेने साथ दिल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

# देशातील हवा प्रदूषणाला अमेरिका जबाबदार

**नवी दिल्ली-** भारतामध्ये दिल्लीसारख्या शहरांनी प्रदूषणाची धोक्याची पातळी गाठलेली असताना अमेरिकेसारखा मित्रदेशच भारताला अस्वच्छ इंधनाचा पुरवठा करत आहे. तेल शुद्धीकरण प्रकल्पांमध्ये कच्च्या तेलावर प्रक्रिया केल्यानंतर बॅरलच्या तळाशी उरणाऱ्या डांबरासारख्या पदार्थाचा भारताला पुरवठा केला जात आहे. हा पदार्थ स्वस्त आणि जाळल्यानंतर कोळशापेक्षा उष्णता निर्माण करत असला तरीही हृदयाला धोकादायक असा अतिप्रमाणात कार्बन आणि फुप्फुसांना हानिकारक अशा सल्फरचे उत्सर्जन करत असल्याने प्रदूषण पातळीत वाढच होत आहे.

एपी या वृत्तसंस्थेच्या चौकशीमध्ये हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भारत हा नेहमीच इंधनाचा सर्वात मोठा आयातदार देश आहे. अमेरिकेने काही वर्षांपूर्वीच स्वत:चे तेल



उत्पादन सुरू केले आहे, परंतु देशभरात 'पेटकोक' प्रकारातील हा पेट्रोलियम पदार्थ पाठविण्याचे सोडून केवळ भारतालाच हे इंधन पाठविले जाते. २०१६ मध्ये अमेरिकेने तब्बल आठ दशलक्ष मेट्रिक टन पेटकोकचा भारताला पुरवठा केला आहे. हा पुरवठा २०१० पेक्षा २० पटींनी जास्त आहे. या इंधनाचा वापर भारतातील लाखोंनी असलेल्या कंपन्या आणि प्रकल्पांमध्ये करण्यात येतो. आणि याच कंपन्यांमधून घातक अशी प्रदूषित हवा वातावरणात सोडण्यात येत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. गेल्या दशकभरापासून पेटकोक हे इंधन भारतामधील कंपन्यांमध्ये ज्वलनासाठी वापरण्यात येणारे सर्वात महत्त्वाचे इंधन बनले असल्याचे उद्योगांतील अधिकाऱ्यांनी सांगितले. हे इंधन टाकाऊ वस्तूंच्या पुनर्वापर प्रक्रियेसाठी वापरण्यात येते. तर, आरोग्य आणि पर्यावरणाशी संबंधित वकिलांनी सांगितले की, अमेरिका पर्यावरणाच्या समस्यांना निर्यात करण्याचे काम करत आहे. पेटकोक या अशुद्ध इंधनाचे जगभरात सर्वाधिक उत्पादन घेणारा देशही अमेरिकाच असल्याचे फेडरल ॲंड इंटरनॅशनलच्या आकडेवारीमध्ये म्हटले आहे.

# लोकशाहीस इंटरनेटचा धोका

**नवी दिल्ली -** इंटरनेटमुळे जगात लोकशाहीचे अस्तित्व संकटात असून अमेरिका आणि भारत सर्वात जुन्या,



मोठ्या लोकशाही देशांनी हातमिळवणी करण्याची गरज असल्याचे मत शुक्रवारी दिल्लीत आलेले अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. एका विशिष्ट नेत्याचे समर्थन करताना आपण कोणत्या विचारधारेला प्रोत्साहन देत आहोत, नेता अयोग्य गोष्ट करीत असेल, तेव्हा मी त्याचे समर्थन करतो का, असा प्रश्नही स्वतःला विचारला पाहिजे, असेही ते म्हणाले. भारत आणि अमेरिकेत बरेच साधर्म्य आहे. दोन्ही देशांच्या राज्यघटनेची सुरुवात 'वुई द पीपल' या तीन शब्दांनी होते. आम्ही बहुविधतेच्या मूल्यांना मानतो. लोकशाहीत सर्वात प्रमुख पद राष्ट्रपती किंवा पंतप्रधानांचे नसून नागरिकांचे आहे. नेता हा अशा आरशासारखा असतो ज्यातून सामूहिक विचार प्रतिबिंबित होतो. विभाजनाच्या विचाराला बळी पडायचे नाही, असे जर संपूर्ण भारताने ठरविले, तर त्यामुळे असा विचार करणाऱ्या नेत्यांचे हात मजबूत होतील, असे ओबामा म्हणाले. पंतप्रधान मोदी मला आवडतात. भारताच्या ऐक्यात ते विश्वास ठेवतात. त्यांच्यापाशी देशासाठी दृष्टीकोन आहे, असे ओबामा म्हणाले. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचाही उल्लेख करायला ते विसरले नाही. मनमोहन सिंग आपले उत्तम मित्र होते.

# विद्यार्थ्यांअभावी राज्यातील 1300 शाळा बंद

**पुणे-** शिक्षणात महाराष्ट्र प्रगत झाल्याचा दावा करणार॰या राज्य सरकारने 'कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या खालावत असलेल्या' शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे राज्यातील तब्बल तेराशे शाळा बंद होणार आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील ७६ शाळांचा समावेश आहे. या शाळांमधील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना नजीकच्या अन्य सरकारी वा खासगी शाळेत सामावून घेण्याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. राज्य सरकारचा हा निर्णय शिक्षण हक्क कायद्याचा थेट भंग करणारा असल्याचे मत शिक्षणक्षेत्रातून व्यक्त होत आहे.

खासगी शाळांमधील दहा हजार विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदांच्या शाळेत प्रवेश घेतल्याचे सांगणाऱ्या शिक्षण विभागाने, जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमधील पटसंख्या



खालावल्याचे आणि गुणवत्ता कमी झाल्याचे कारण पुढे करत शाळा बंद करण्याचा घेतलेल्या या निर्णयाने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. गरीब आणि उपेक्षित घटकांतील विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसणार असून, या निर्णयाच्या विरोधात विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आवाज उठविणार असल्याचे शिक्षक आमदार कपिल पाटील आणि विक्रम काळे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद, ग्रामीण भागातील अनुदानित सुमारे तेराशे शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावी विद्यार्थ्यांची पटसंख्या दहाच्या आत आहे. कमी गुणवत्तेमुळेच या शाळांची पटसंख्या घटल्याचा निष्कर्ष काढून त्या बंद करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. या शाळांच्या तीन किलोमीटर परिसरातील अन्य शाळांत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार असल्याने शिक्षण हक्काचा भंग होणार नसल्याचा दावा शिक्षण विभागाने केला आहे.

